# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.७२३ दिनांक २८/०९/२०२०**

**वालीव पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थाची वाहतुक करणा-या आरोपीतांवर कारवाई करुन ८३,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त**

दि.२७/०९/२०२० रोजी ०९.३० वा.चे सुमारास वालीव पोलीस ठाणे हद्दीत ड्रॅगर कंपनी, पो.कामण, ता.वसई, येथे यातील आरोपीत फैजअहमद मोहम्मद हाशिम शेख याने त्याचे ताब्यातील होंडा ॲक्टीव्हा मो.सायकल क्र. MH-48-AZ-3841 हिचेवर मानवी आरोग्यास अपायकारक व महाराष्ट्र शासनाने तंबाखुजन्य अन्न पदार्थां संबंधात जारी केलेल्या प्रतिबंधीत आदेशाची अवज्ञा करुन वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंध केलेला माल जवळ बाळगुन वाहतुक करीत असताना मिळुन आला म्हणुन १)४३,५६०/- रुपये किंमतीचा केसर युक्त विमल पानमसाला कंपनीचा गुटखा सदृश्य तंबाखुजन्य गुटख्याचे २५ पाकीटे त्यात २२ नग प्रत्येकी एक पाकीटमध्ये. २)४८,४०/- रुपये किंमतीचा वि.१ कंपनीची तंबाखुजन्य गुटख्याची २२० पाकिटे त्यात ११ नग प्रत्येकी एका पाकीटामध्ये ३)३५,०००/- रुपये किंमतीची एक काळया रंगाची होंडा कंपनीची मोटार सायकल क्रमांक MH-48-AZ-3841 असा एकुण ८३,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत याचे विरुद्ध **वालीव पोलीस ठाणे** I ७७०/२०२० भादविसं कलम ३२८,२६९,२७०,२७३,१८८ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियमकलम २६(२),४,३०(२)(ए), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, प्रभारी अधिकारी वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.